# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

### कार्यपत्रिका क्रमांक - २२६

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ३१/०५/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ३१/०५/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
४) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५) मा.काळे विमल रमेश
६) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
८) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
१०) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११) मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
१२) मा.लोंढे शुभांगी संतोष
१२) मा.वाबळे संजय मल्हारराव
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.खांडकेकर,मा.खोसे,मा.दंडवते,मा.कडूसकर,मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.दुधेकर, मा.निकम,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण, मा.कपिले,मा.पठाण, मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.शेख,मा.पुजारी, मा.गायकवाड,मा.भोसले,मा.सोनवणे,मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,

मा.वाघमारे–मुख्य अभियंता-पीएमपीएमएल मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३२)** | मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचे वापराकरीता नविन वाहन खरेदी करणेबाबत... |
| **<u>विषय क्र.३३)</u>** | मनपाचे उद्यान अंशतः सेवाशुल्क तत्वावर देखभाल व संरक्षणाकामी देणेबाबत- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **<u>विषय क्र.३४)</u>** | मा.स्थायी समिती ठराव क्र.११८९९ दि.३०/६/२०१५ रद्द करणेबाबत- मा.अमिना पानसरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.३५)** | प्रभाग क्र.४७ येथे स.नं.१२४ मध्ये नियोजित १८.०० मी. व १२.०० मी. रुंद रस्त्यासाठी नाल्यावर पूल बांधणेबाबत... |
| **विषय क्र.३६)** | डॉ.साळुंके राहुल यशवंत, वैद्यकिय अधिकारी यांचे दिनांक ३०/५/२०१६ चे अपिल अर्जाबाबत-मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.३७)** | मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमण्याबाबत-मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.३८)** | फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.३९)** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील तरतुद वर्गीकरण करणेबाबत- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.४०)** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग व मुख्यालयामध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |
| **विषय क्र.४१)** | फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव... |

----------

अ) दिनांक २४/०५/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२५) चा सभावृतांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक –१६३२३ विषय क्रमांक – १

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– पाणीपुरवठा

सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४७/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.5/49/2015-16. मधील अ.क्र.30 अन्वये - सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.५८ मधील सी.एम.ई कॉलनी ते गणेशनगर परिसरातील जुन्या सी.आय.लाईन बदलून नवीन डी.आय.पाईपलाईन (वितरण नलिका) टाकणेकामी मे.जय इंजिनियर्स यांची निविदा रक्कम रू.9,80,292/- (अक्षरी र.रु.नऊ लाख ऐंशी हजार दोनशे ब्यान्नव फक्त) पेक्षा 17.60 % कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.8,48,148/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२४ विषय क्रमांक – २

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–पाणीपुरवठा

सुचक – मा.जालिंदर शिंदे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४३/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.6/38/2015-16 मधील अ.क्र.16 अन्वये इ प्रभाग पाणीपुरवठा विभागातील पाणीपुरवठा विषयक दुरूस्तीची कामे करणेकामी मे.सचीन ढेकणे & असोसिएटस निविदा रक्कम रू.21,00,806/- (अक्षरी र.रु एकवीस लाख आठशे सहा फक्त) पेक्षा 42.50% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.12,68,362/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आलेल्या असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२५ विषय क्रमांक – ३
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– पाणीपुरवठा
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४२/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.6/38/2015-16 मधील अ.क्र.21 अन्वये भोसरी गावठान आश्रमशाळा इंद्रायणीनगर येथील पाण्याची टाकी व भोसरी संप/ पंप हाऊस येथील टाक्यांची शास्त्रीय पद्धतीने साफसफाई करणे व किरकोळ देखभाल दुरूस्तीची कामे करणेसाठी मे. व्ही.ए.झोंबाडे निविदा रक्कम रू.14,00,313/- (अक्षरी र.रु.चौदा लाख तीनशे तेरा फक्त) पेक्षा 26.70% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.10,77,751/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आलेल्या असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२६ विषय क्रमांक – ४
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–पाणीपुरवठा
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.रोहितअप्पा काटे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४४/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.5/49/2015-16 मधील अ.क्र. 7 अन्वये- ब मुख्यालय अंतर्गत सन २०१५-१६ साठी जलक्षेत्र क्र.बी/३ व ५ ते ८ मध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणेसाठी मे.सुदर्शन वॉटर सप्लायर्स यांची निविदा रक्कम रू.12,60,290/- (अक्षरी- बारा लाख साठ हजार दोनशे नव्वद फक्त) पेक्षा 3.00% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.12,83,605/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२७ विषय क्रमांक – ५
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– पाणीपुरवठा
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक – मा.सुमन नेटके
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४५/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.5/49/2015-16 मधील अ.क्र. 37 अन्वये- सन २०१५-१६ साठी प्रभाग क्र.६१,६४ दापोडी मधील जुन्या सी आय लाईन बदलून नवीन डी.आय.पाईप लाईन टाकणेसाठी मे. जय इंजिनियर्स यांची निविदा रक्कम रू.9,80,292/- (अक्षरी र.रु. नऊ लाख ऐंशी हजार दोनशे ब्यान्नव फक्त) पेक्षा 17.60% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.8,48,149/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२८ विषय क्रमांक – ६
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– पाणीपुरवठा
सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४६/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.5/49/2015-16. मधील अ.क्र. 28 अन्वये- सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील सांगवी गावठाण परिसरातील जुन्या सी.आय.लाईन बदलून नवीन डी.आय.पाईपलाईन (वितरण नलिका) टाकणेकामी मे. जय इंजिनियर्स यांची निविदा रक्कम रू.11,08,204/- (अक्षरी- अकरा लाखआठ हजार दोनशे चार फक्त) पेक्षा 17.60% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.9,58,818/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३२९ विषय क्रमांक – ७

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–औद्योगिक प्रशिक्षण संस्था

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं(मु)/१/कावि/४९५/२०१६ दि.१८/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी करिता ०५ व औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी करिता ०१ अशा एकूण ०६ कर्मचा-यांची आदेश क्र.औप्रसंमु/०१/कावि/०७/२०१६ दिनांक ०४/०१/२०१६ अन्वये र.रू.१७,०००/- (अक्षरी र.रू. सतरा हजार फक्त) वर हंगामी स्वरूपाची तात्पुरती नेमणूक, एकत्रीत मानधनावर देणेत आली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी येथील अ.क्र. १ ते ५ व औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी येथील अ.क्र.६ या खालील कर्मचा-यांना दिनांक १४/१०/२०१५ ते दिनांक १३/०४/२०१६ अखेर ६ महिने करिता मानधन तत्वावर हंगामी स्वरूपाची नेमणूक करण्यात आली आहे. प्रस्तुतचा कालावधी पुर्ण होत असल्याने त्यांची एक दिवसाची सेवा खंडीतकरून पुढील सहा महिने कालावधी करिता एकत्रित मानधनावर नियुक्ती देणे आवश्यक आहे.

| अनु. क्र. | नाव | पदनाम | नियुक्तीचा विभाग | मानधन र.रू. |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. कुमावणी मनसरा गोपीराम | मानधन निदेशक | औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी | १७,०००/- |
| २ | श्रीम. निलवर्ण सोनाली पांडुरंग | मानधन निदेशक | | १७,०००/- |
| ३ | श्री. कांबळे सिध्दार्थ अभिमन्यू | मानधन निदेशक | | १७,०००/- |
| ४ | श्रीम. चिंचवडे वंदना नरसिंग | मानधन निदेशक | | १७,०००/- |
| ५ | श्रीम. कोंडे हेमाली बाळकृष्ण | मानधन निदेशक | | १७,०००/- |
| ६ | श्रीम. कुंभार अलका बाबुराव | मानधन निदेशक | औ.प्र.संस्था मोरवाडी | १७,०००/- |

सबब उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक ०१ ते ०६ कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या एकत्रित मानधन रक्कमेवर दिनांक १४/०४/२०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) व दिनांक १५/०४/२०१६ (श्रीराम नवमी) रोजी सार्वजनिक सुट्टया असलेने दिनांक १६/०४/२०१६ रोजी एक दिवस सेवा खंडीत करून व दिनांक १७/०४/२०१६ रोजी साप्ताहिक सुट्टी असलेने दिनांक १८/०४/२०१६ ते दिनांक १७/१०/२०१६ अखेर सहा महिने कालावधीकरिता एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३० विषय क्रमांक – ८
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.जालिंदर शिंदे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२३९/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.18/2015-16 मधील अ.क्र 19 अन्वये प्र.क्र.२४ व ४२ मधील हायमास्ट दिव्यांची नुतनीकरण करणे व उर्जा बचतीच्या हेतुने दिव्यांची नुतनीकरण करणेकामी मे.यश इलेक्ट्रोलाईन नि.र.रू.2,18,782/-(अक्षरी र.रु.दोन लाख अठरा हजार सातशे ब्याऐंशी फक्त) पेक्षा 43.17 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३१ विषय क्रमांक – ९
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२५२/२०१६ दि.१८/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.18/2015-16 मधील अ.क्र 25 अन्वये प्रभाग क्र.४२ येथील विविध झोपडपट्टी मधील सो.व्हे.फिटिंग बदलणेकामी मे.कमल इलेक्ट्रीकल एंटरप्रायजेस नि.र.रू.2,52,465/-(अक्षरी र.रु.दोन लाख बावन्न हजार चारशे पासष्ठ फक्त) पेक्षा 39.10 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३२ विषय क्रमांक – १०
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२५०/२०१६ दि.१८/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 18/2015-16 मधील अ.क्र.15 अन्वये प्रभाग क्र.२४ प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मधील रस्त्यावरील जुन्या सो.व्हे. फिटींग काढून उर्जा बचतीच्या हेतुने दिव्यांची नुतनीकरण करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीकल एंटरप्रायजेस नि.र.रू.1,71,108/- (अक्षरी र.रु. एक लाख एक्काहत्तर हजार एकशे आठ फक्त) पेक्षा 30.00 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१६३३३ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.रोहितअप्पा काटे
संदर्भ:-मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१२४८/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.18/2015-16 मधील अ.क्र.13 अन्वये चिंचवड उपविभागात आवश्यकतेनुसार हायमास्ट दिवे बसविणे, दिव्यांची नुतनीकरण करणे व उर्जा बचतीच्या हेतुने दिव्यांची नुतनीकरण करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीकल एंटरप्रायजेस नि.र.रू.2,15,048/- (अक्षरी र.रु.दोन लाख पंधरा हजार अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा 28.00 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३४ विषय क्रमांक – १२
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक – मा.सुमन नेटके
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/७७/२०१६ दि.१९/०५/२०१६.

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे-

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०२.०५.२०१६ ते दि.०८.०५.२०१६ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/७७/२०१६ दि.१९.०५.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाच्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३५ विषय क्रमांक – १३
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–इ क्षेत्रीय अधिकारी
सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.संजय वाबळे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१७३/१६ दि.२०/०५/२०१६

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.1/22-2015-16 मधील अ.क्र.8 अन्वये प्रभाग क्र.६ बो-हाडेवाडी टाकी वरुन वितरण होणा-या भागात दुरुस्ती विषयक कामे करणेकामी मे.जय इंजिनिअर्स निविदा रक्कम रू.5,04,090/- (अक्षरी र.रु.पाच लाख चार हजार नव्वद फक्त) पेक्षा 30.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३६ विषय क्रमांक – १४

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– इ क्षेत्रीय अधिकारी

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१७४/१६ दि.२०/०५/२०१६

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.1/22-2015-16 मधील अ.क्र.2 अन्वये प्रभाग क्र.29 इंद्रायणीनगर मधील से.नं.2, हॉटेल हवेली परिसर, लांडगेनगर, गुरूविहार परिसरात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरूस्ती कामे करणे. (जलक्षेत्र 3) कामी मे.एस.एस.साठे निविदा रक्कम रू.5,04,090/- (अक्षरी र.रु.पाच लाख चार हजार नव्वद फक्त) पेक्षा 30.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३७ विषय क्रमांक – १५

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– इ क्षेत्रीय अधिकारी

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.जालिंदर शिंदे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१७२/१६ दि.२०/०५/२०१६

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.1/22-2015-16 मधील अ.क्र.10 अन्वये प्रभाग क्र.35 मधील धावडे वस्ती परिसरामध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (जलक्षेत्र 3) कामी मे. बालाजी इंजिनिअर्स निविदा रक्कम रू.5,18,006/- (अक्षरी र.रु.पाच लाख अठरा हजार सहा फक्त) पेक्षा 30.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–बीआरटीएस

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीआरटीएस/स्था/३८१/२०१६ दि.२३/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

आकुर्डी – प्राधिकरण येथील रेल्वे मार्गालगतच्या सुशोभिकरणाचे कामाचे नियोजन व आराखडे तयार करणे करिता वास्तुविशारद व निविदा पश्चात कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँड अर्बन प्लॅनर यांची नेमणुक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३३९ विषय क्रमांक – १७
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–प्रशासन
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१५/कावि/३०५/२०१६ दि.२०/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी,भुखंड,घरदुरुस्ती,घरविस्तार अग्रिम दिले जात आहे.सद्यस्थितीत शासन निर्णय क्रमांक घबांअ-१०.११ प्र.क्र.५६/२०११, विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२७ फेब्रुवारी २०१२ अन्वये तसेच मनपा धोरणानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे व त्यानुसार घरबांधणी व इतर अग्रिम मंजूर केले जाते.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल | मनपा धोरण | कमाल मर्यादा र.रु. |
|---|---|---|---|
| १. | तयार घर खरेदी करणे (नवीन घरबांधणी अग्रिम) | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे १०० पट | २५,००,०००/- |
| २. | घरविस्तार अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे ५० पट | ४,००,०००/- |
| ३. | घरदुरुस्ती अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे ५० पट | २,००,०००/- |
| ४. | भुखंड खरेदी अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे ५० पट | ४,००,०००/- |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबां अ-२०१२/ प्र.क्र.३०/२०१२/ विनियम मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक. २० फेब्रुवारी २०१५ अन्वये घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करणेत आली आहे.सदर शासन निर्णय व यापूर्वीचे मनपाचे धोरण विचारात घेऊन खालीलप्रमाणे घरबांधणी व इतर अग्रिम मंजूरीचे धोरणात सुधारणा करणे आवश्यक वाटते.

शासन निर्णय.-

१) घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा.-

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी मनपा कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतन (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) विचारात घेण्यात यावे.अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१००१/प्र.क्र. ६७/सेवा-५, दि. २४ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या एक्स वाय व त्याव्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरामध्ये

घर/सदनिका/ जमीन खरेदीसाठी सुधारीत कमाल मर्यादा पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे. व सदरच्या निर्णयामध्ये वित्त विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक.घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.२९ फेब्रुवारी २०१६ अन्वये दि.२४ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीमधून सूट देऊन पुणे (नागरी समुह) याकरीता “एक्स” वर्गीकरणात या आदेशान्वये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारीत वेतनबॅंड मधील वेतन (मुळ वेतन + ग्रेड वेतन) विचारात घेऊन घरबांधणी अग्रिम रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत खाली नमुद केलेप्रमाणे सुधारणा केली आहे.

| अ.क्र | अग्रिमाचा तपशिल | घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| | | “एक्स” वर्गीकरण |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा<br>२) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे,किंवा<br>३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा<br>४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे.<br>( भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे.<br>( घरविस्तार अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) १०० पट किंवा रु.७.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा |

| | | |
|---|---|---|
| | सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.), राष्ट्रीयकृत बॅंका/सहकारी बॅंका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घर बांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | कर्मचा-याने वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम वजा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेपर्यत कर्मचा-याने संस्थेला परतफेड केलेली रक्कम किंवा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला वित्तीय संस्थेला परतफेड करण्यासाठी बाकी राहिलेली रक्कम किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| फ) | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (AuthorisedValuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

२) घरबांधणी अग्रिम मंजुरीसाठी घरांची किंमत मर्यादा.-

वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१००१/प्र.क्र३६७/सेवा-५ दि.२४ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या “एक्स” व “वाय” या वर्गीकरणातील शहरामध्ये नवीन बांधावयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार नवीन घराची/जुन्या घराची किंमत मर्यादा(जमीनीची किंमत वगळून)कमाल र.रु.२.०० कोटी व त्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणांकरीता कमाल रु.१.०० कोटी अशी विहित करण्यात आली आहे.

३) घरबांधणी अग्रिमाची वसुली.-

अ) घरबांधणी अग्रिमाची वसुली.-

अग्रीमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा पध्दतीने वरील अ,इ आणि फ येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात प्रथम १९२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हप्त्यात व्याज वसूल करण्यात यावे ब , क आणि ड येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसूली व्याजासह कमाल ९६ मासिक हप्त्यात प्रथम ७२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर २४ मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.

ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.

४) एक अर्जदार मनपा कर्मचारी व प्रकरणपरत्वे त्याच्या/तिच्या पत्नीच्या/पतीच्या संयुक्त नावावर घर/जमीन खरेदी करावयाचे असल्यास शासन अधिसूचना क्र.एचबीए१०७१/२१४३/७१/फ-१, दि.१/१/१९७२ मधील तरतुदीनुसार त्यातील अटी व शर्तीच्या अधीन अग्रिम मंजूर करता येईल.

५) मनपा अधिकारी/कर्मचा-यास घर खरेदी/बांधकाम करण्यास सहाय्यभूत व्हावे यासाठी शासन निर्णय क्र.एचबीए १०८३/सीआर४६५/जीईएन ५, दि.१३/०६/१९८४ मधील परि.३ मधील घराचा व्दितीय प्रभार स्विकारण्याबाबतच्या अटीत पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.सदर शासन निर्णयातील अन्य अटी व शर्तीच्या अधीन राहून,सदर घर/सदनिका यावर वित्तीय संस्थेचे कर्ज व मनपा अग्रिम यांच्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार प्रभार निर्माण करुन इतर वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारता येईल. कोणत्याही परिस्थितीत मनपा अग्रिम रक्कम मंजूर केलेल्या प्रमाणाच्या टक्केवारीपेक्षा कमी प्रभार स्विकारणार नाही. मनपा व वित्तीय संस्था या दोन्हीचा मिळून येणारा प्रभार घऱाच्या किंमती इतका असावा.

६) खाजगी बांधकाम व्यवसायिक(बिल्डर) ठेकेदार, कंपनी, सिडको, हुडको, म्हाडा, शासनाने मंजूर केलेल्या कोटयातून, इत्यादीकडून तयार सदनिका अथवा बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यासाठी मुंबई वित्तीय नियम,१९५९

मधील परिशिष्ट-२६ मधील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे एक किंवा एका पेक्षा जास्त हस्यात अग्रिम अनुज्ञेयराहील.

७) मनपा सेवेतील पुनर्नियुक्त माजी सैनिक असलेल्या कर्मचा-याला संदर्भाधीन शासन निर्णय क्र.अग्रिम-१०९६/प्र.क्र.४/९६/विनियम,दि.२३/०६/१९९७ मधील तरतुदी नुसार अग्रिम अनुज्ञेय राहील.

८) अग्रिम मंजूरीसाठी पुढीलप्रमाणे अटी लागू राहतील.-

१) महापालिका ठराव क्र.५९८, दिनांक २०/११/२०१४ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/१५/कावि/६५/२०१५, दिनांक.०३/०२/२०१५ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०२ वर्ष सेवा पुर्ण झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणे अग्रिम मंजूर करतेवेळी मनपा अधिकारी/कर्मचारी यांचा उर्वरीत सेवाकालावधी किमान ५ वर्ष शिल्लक असणे अनिवार्य आहे.

२) वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय होईल.मात्र मनपाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या/खरेदी केलेल्या घराच्या नैसर्गिक आपत्तीतून उदभवलेल्या दुरुस्ती करता पहिल्यांदा ५० पटीपेक्षा कमी पटीत मनपा अधिकारी/कर्मचा-यास घरबांधणी अग्रिम मंजूर केलाअसेल त्यांना २०० पट वजा आधी मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाची पट यातील फरकाच्या पटीत दुस-यांदा अग्रिम अनुज्ञेय होईल. सदर अग्रिमाची रक्कम फरकाच्या पटीतील रक्कम किंवा घराची किंमत किंवा र.रु.१५ लक्ष यापैकी कमी असेल ती रक्कम अनुज्ञेय राहील.

३) महापालिका ठराव क्र.७९८ दि. २५/०१/२०१६ नुसार परिपत्रक क्र.प्रशा/१५ /कावि/८७/२०१६ दि.२९/०४/२०१६ अन्वये नोंदणीकृत इक्वीटेबल मॉर्गेज (नोटीस ऑफ इंटीमेशन रिगार्डींग मॉर्गेज बाय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) करणे अनिवार्य आहे.

४) घराच्या किंमतीइतका घराचा विमा, शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिम धारकाने दक्षता घ्यावी.

५) पती ,पत्नी दोघेही मनपा कर्मचारी असले तरीही त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

६) वरील सर्व प्रयोजनार्थ घेण्यात येणा-या अग्रिमाकरिता घर/जमीन अर्जदाराच्या स्वताच्या नावावर असणे आवश्यक राहील. तसेच महापालिका ठराव क्र.५९८, दिनांक २०/११/२०१४ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/१५/कावि/६५/२०१५, दिनांक.०३/०२/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीपासून २० कि. मी. अतंरापर्यंत घर/फलॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

७) दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोन पेक्षा अधिक अपत्ये असणा-या अर्जदारास (दुस-या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

८) अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्हीबाबीची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

९) मनपा अधिकारी/कर्मचारी, यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करताना, त्याच्या शिल्लक घरबांधणी अग्रिम मुददल व व्याजाची वसूली, त्या अधिकारी/कर्मचारी याच्या सेवानिवृत्ती उपदान अथवा परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून वसूल करण्यासंदर्भात संमती पत्र देणे आवश्यक असेल. सदर संमतीपत्र घेण्याची जबाबदारी अग्रिम मंजूर करणा-या आधिका-याची राहील.

१०) मनपा सेवेत असताना अग्रिम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून दयावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुददलाची पूर्ण रक्कम त्यांच्या मृत्यु-नि-सेवा उपदान/परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहिल्यास रु. १.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करता येईल व ती रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतरही मनपा अधिकारी/कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचा-याच्या वारसाकडून अथवा वारसदारास अनुकंपा तत्वावर मनपा सेवेत नियुक्त केल्यास त्याच्याकडून शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका मनपाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून वसूली करावी. तसेच लाड कमिटीचे शिफारशीनुसार होणा-या वारस नियुक्ती वेळेस कर्मचा-याने घेतलेल्या घरबांधणी अग्रिम मुददल व व्याजाची पुर्ण रक्कम त्यांच्या मृत्यु - नि-सेवा उपदान/ परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी.

परंतू त्यानंतरही काही रक्कम शिल्लक राहिल्यास त्यांचे वारसाकडून वसूल करण्यात यावी.

११) घरबांधणी अग्रिमधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम क्र.८ नुसार मनपा सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केल्यास/बडतर्फ केल्यास अथवा सेवेतून काढून टाकले असल्यास सक्तीने सेवानिवृत्तीच्या/बडतर्फीच्या/सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या मनपाचे रकमामधून, वसूल करावयाची शिल्लक घरबांधणी अग्रिमाची संपूर्ण रक्कम व शिल्लक व्याजाची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात यावी. यानंतरही मनपाअधिकारी/कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित अधिकारी/कर्मचा-याने शिल्लक रक्कम मनपास त्वरीत एकरकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका मनपाकडेगहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करुन त्या रकमेतूनवसूली करावी.

१२) घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१३) अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच मनपाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील.

१४) मनपा अधिकारी/कर्मचा-यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यास कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसूरदाराकडून अग्रिमाची रक्कम,प्रचलित व्याजदर+२.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

१५) प्रशासन विभागाकडील घरबांधणी अग्रिम लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध असली पाहिजे.

१६) मनपा कर्मचा-यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या प्रथम हस्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधित कर्मचा-याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रिम न घेता प्रथम हस्यात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम परत करून अग्रिम रदद केल्यास अग्रिम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने

गणना करुन रक्कम परतीच्या दिनांकापर्यंतच्या व्याजाची वसूली करण्यात यावी.तसेच,सदर अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.

१७) प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचा-यांना अग्रिम मंजूरीसंदर्भात वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.एफएनआर १०७०/२०७६/एफ-१ दि.९ मे,१९७२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

१८) वेतनातून करावयाच्या सर्व वजावटी आणि मागणी केलेल्या अग्रिम रकमेच्या संभाव्य हप्त्याची रक्कम वजा जाता शिल्लक राहणारी निव्वळ वेतनाची रक्कम ही वेतन प्रदान अधिनियम १९३६ नुसार देय असणा-या वेतनाच्या रकमेपेक्षा कमी असता कामा नये.

९) अग्रिम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढील प्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | राहिलेल्या शासन सेवेची मर्यादा | परतफेडीची क्षमता |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक(वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) वेतनाच्या ८५ टक्के |
| २. | १० वर्षानंतर परंतू २० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत. | मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन+ग्रेड वेतन) वेतनाच्या १०० टक्के |
| ३. | १० वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणा-या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) वेतनाच्या १०० टक्के |

१०) व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये मंजूर करण्यात येणा-या घरबांधणी अग्रिमातील रु १५.०० लक्ष पर्यंतच्या रकमेवरील व्याजाची परिगणना शासन निर्णय, घबांअ(व्याजदर)-१०१२/प्र,क्र.७/२०१२/विनियम,दि.१० मे,२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या ९.५० टक्के या दराने व त्यावरील रकमेवरील व्याजाची परिगणना (९.५०+२.००) टक्के म्हणजेच ११.५० टक्के या दराने करण्यात यावी.ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले असेल त्या आर्थिक वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्या दराने व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४९/९९/विनियम, दि.५ मे, २००० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.

११) यापूर्वी मंजूर करण्यात घरबांधणी अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येणार नसल्याने वाढीव घरबांधणी अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

सबब शासन निर्णयात व मनपा धोरणात नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४० विषय क्रमांक – १८

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.रोहितअप्पा काटे अनुमोदक – मा.संदीप चिंचवडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५२९/१६ दि.२३/५/२०१६

विषय- प्रभाग क्र.13 मध्ये हिंदु स्मशानभुमीची जुनी सिमाभिंत पाडुन नवीन आर.सी.सी.सिमाभिंत बांधणेबाबत...

विषय क्रमांक १८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४१ विषय क्रमांक – १९

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग– स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५२५/१६ दि.१९/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/9/2015-16 अन्वये प्रभाग क्र.3 चिखली येथील मोरे वस्ती मधील टॉवर लाइन रोड लगत स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे कामी मे.प्रफुल्ल रामचंद्र जाधव नि.र.रु.46,66,227/- (अक्षरी र.रु.सेहचाळीस लाख सहासष्ठ हजार दोनशे सत्तावीस फक्त) पेक्षा 51.99% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.23,52,268/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४२ | विषय क्रमांक – २०

दिनांक – ३१/०५/२०१६ | विभाग– स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.संजय वाबळे | अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५३०/१६ दि.२३/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/12/2015-16 अन्वये प्रभाग क्र.3 चिखली मध्ये उंबर ओढा येथील नाल्याला CD वर्क करणेकामी मे.नाणेकर आणि असोसिएट्स नि.र.रु.1,40,04,945/- (अक्षरी र.रु.एक कोटी चाळीस लाख चार हजार नऊशे पंचेचाळीस फक्त) पेक्षो 29.99% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.1,02,95,105/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४३ | विषय क्रमांक – २१

दिनांक – ३१/०५/२०१६ | विभाग–माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.अनिता तापकीर | अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/४४/२०१६ दि.२४/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष, दिनांक १४ एप्रिल २०१५ ते १४ एप्रिल २०१६ हे वर्ष "समता व सामाजिक न्याय वर्ष" म्हणून साजरे करण्यास सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत शासन निर्णय क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/बांधकामे दि.०९/१०/२०१५ प्राप्त झाले आहेत. तसेच जयंती वर्षा निमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम राबविणेकामी सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि.२८/०३/२०१६ रोजी आचार्य अत्रे रंगमंदीर, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-१८ येथे करण्यात आले होते. याकामी आदेश क्र.माजसं/४/कावि/१४/२०१६ दि.१९/०३/२०१६ अन्वये आगाऊ र.रु.२,६६,०००/- इतकी आगाऊ रक्कम मा. प्रशासन अधिकारी यांचे नावे अदा केलेली आहे. या अंतर्गत आयोजित स्पर्धेतील विजेत्यांची बक्षीस रक्कम, प्रमाणपत्रे व त्यावरील लिखान, लॅमिनेशन परिक्षकांचे मानधन, स्मृतिचिन्ह, फ्लेक्स बॅनर छपाई व फ्रेम रेन्ट, मान्यवर/कलाकार चहापान, भोजन व्यवस्था, कलाकारांचे मानधन, निवास, रंगमंदीर भाडे, संविधान पुस्तके, निमंत्रक विमान प्रवास भाडे इ. करीता थेट पध्दतीने खर्च र.रु.३,४१,२८३/- (अक्षरी र.रु. तीन लाख एक्केचाळीस हजार दोनशे त्र्याऐंशी फक्त) या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१६३४४ विषय क्रमांक – २२
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.जालिंदर शिंदे अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/३१४/२०१६ दि.२३/५/२०१६

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४-८/२०१५-१६ अन्वये, श्रीनगर व रहाटणी परिसरात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी ठेकेदार मे.जय इंजिनिअर्स नि.र.रु ६,३०,४४८/- (अक्षरी र.रु.सहा लाख तीस हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा ३८.८३% कमी, या मंजूर दराने र.रु ३,८५,६४५/- पर्यंत ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आलेला असुन, कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४५ विषय क्रमांक – २३
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:-मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५५३/२०१६ दि.२३/५/२०१६

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाचे अ क्षेत्रीय कार्यालयाकडील झेरॉक्स मशीन दुरुस्त करणेकामी आवश्यक असलेले स्पेअरपार्ट (एकूण ७ बाबी) खरेदी करुन दुरुस्ती करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०५/२०१६-१७ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिलबंद लिफाप्यात कोटेशन दर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीनदरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.फोनिक्स बिजनेस मशीन, यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्तीचे बाब क्र.१ ते ०७ साहित्याचे र.रु.१९,७२७/- लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३.४९% ने कमी आहे. मे.फोनिक्स बिजनेस मशीन, पुणे यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्ती करणेकामी एकूण र.रु.१९,७२७/- दर स्विकृत करणेत आले असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४६ विषय क्रमांक – २४

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–नगरसचिव

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/२/कावि/१६७/२०१६ दि.२५/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मा.उपमहापौर यांचे वापरातील मनपा वाहन क्रमांक एम.एच.१४ सी.एल.१४८३ (टाटा मांझा) करीता नविन चार टयुबलेस टायर्स मे.दर्शन टायर्स याचेकडून थेट पध्दतीने निविदा न मागविता व करारनामा न करता खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या र.रु.१८,०००/- (अक्षरी र.रु. अठरा हजार फक्त) मे. दर्शन टार्यस,चिंचवड यांना आगावू अदा करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४७ विषय क्रमांक – २५

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.रोहितअप्पा काटे अनुमोदक – मा.संदीप चिंचवडे

संदर्भ:-मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/२९८/२०१६ दि.२४/५/२०१६

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाचे माध्यमिक शिक्षण विभागासाठी अरोबिक्स व्यायाम प्रकारासाठी ट्रॅकसुट, साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.45/2015-16 अन्वये, ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम कोटेशनधारक मे.शिवसमर्थ इंटरप्रायजेस यांचे दर र.रु.730/- प्रमाणे एकूण 60 ट्रॅकसूट खरेदीकामी र.रु.43,800/- चे दर स्विकृत करुन सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३४८ विषय क्रमांक – २६

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/११४७/२०१६ दि.२३/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय /४९/०१/२०१५-१६ मधील, चिखली से.क्र.१७ व १९ येथे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राबविणेत येणाऱ्या प्रकल्पातील रस्ते विकसित करणे व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन नि.र.रु.१,८६,६७,५१८/-पेक्षा ५.४०% कमी (७.४०% कमी सुधारित) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,८१,५०,४२८/-पर्यंत काम करून घेणेस, त्याबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१६३४९ विषय क्रमांक – २७
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मुख्य लेखापरिक्षण
सुचक – मा.संजय वाबळे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.  दि.२५/५/२०१६

मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड १० कलमी कार्यक्रम प्रशासकीय सुधारणा व गतिमानात अभियान स्पर्धा ओयोजित करण्यात आल्या होत्या मुलेपविभागास प्रथम क्रमांकाचे बक्षीस र.रु.१,००,०००/- व प्रशस्तीपत्रक मिळाले असून सदर बक्षीसाची रक्कम कार्यालयीन सुधारणेसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्याअंतर्गत कर्मचारी प्रोत्साहन व शैक्षणिक सहलीसाठी २५% रक्कम म्हणजे र.रु.२५,०००/- विनियोग करणे आवश्यक आहे. त्यानुसार आगाऊ रक्कम रु.२५,०००/- मधून मुलेप विभागातील कर्मचा-यांसाठी दि.१३ व १४ मे २०१६ रोजी आयोजित कोल्हापुर महापालिका व कोयनानगर प्रकल्प पाहणी व अभ्यास दौ-यासाठी झालेल्या रक्कम रु.२५,०००/- खर्चास कार्योतर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५० विषय क्रमांक – २८
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–नगरसचिव
सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/५६१/२०१६ दि.२६/०५/२०१६

नगरसचिव विभागात कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात सोबतचे प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५१ विषय क्रमांक – २९
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–सुरक्षा
सुचक – मा.जालिंदर शिंदे अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/४९९/२०१६ दि.२५/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे कडील सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना १ जानेवारी २०१६ पासून मुळ वेतन र.रु.६०००/- विशेष भत्ता (महागाई भत्ता) २९५३.८०/- असे एकूण वेतन रक्कम रुपये १४६०४.५५ प्रमाणे येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५२ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मध्यवर्ती औषध भांडार
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१३०/२०१६ दि.२६/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मनपाकडील नोंदणीकृत निविदाधारक मे. शशी एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडुन Tab Oseltamivir 75mg– ५००० गोळ्यांची र.रू.३८५/- (१० गोळ्या) याप्रमाणे र.रू. १,९२,५००/- व मे. फार्मासिआ लिंक, पुणे यांचेकडुन Syp. Oseltamivir 75ml- ५०० बाटल्यांसाठी र.रू. ३६४.६४ (१ बॉटल) प्रमाणे र.रू. १,८२,३२०/- असा एकुण र.रू.३,७४,८२०/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्चास व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कराराचा करून यापुढेही आवश्यकतेप्रमाणे टप्प्या-टप्प्याने खरेदी करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी र.रु.५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख फक्त) पर्यंतचे मर्यादेपर्यंतच खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५३ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.रोहितअप्पा काटे
संदर्भ:-मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/२६६/२०१६ दि.२३/५/२०१६

मा.सहआयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाचे गणवेश देय कर्मचा-यांना पादत्राणे (कटशुज) खरेदीकामी निविदा सुचना क्रं ०१/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदे मधिल मे. प्राईड शुज चिंचवड यांना KERRY SHOES- 6208( Internstional) Formal shoes, pvc sole,upper leather , finishing inside leather,cutioning,light weight पादत्राणे(कटशुज) साठी एकुण र.रु.८,९०,८२४/- प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-</u>**

ठराव क्रमांक –१६३५४ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग–कार्यशाळा
सुचक – मा.संजय वाबळे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/३/कावि/७८९/२०१६ दि.३१/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मा.आयुक्त यांच्या वापरात असलेले वाहन जुने झाले असलेने मा.आयुक्त यांचे वापराकरीता मे.टोयोटो या कंपनीचे ALTIS या मॉडेलचे नविन वाहन खरेदीकामी प्राप्त झालेल्या प्रोफार्मा

इनव्हॉईस क्र.०४ दि.३०/०५/२०१६ नुसार मे.डि.एस.के. टोयोटो, पुणे यांना निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने नविन वाहन खरेदी करणेकामी र.रु.११,९५,०६७/- (अक्षरी र.रु.अकरा लाख पंच्यान्नव हजार सदुसष्ट फक्त) (L.B.T. करासह यामध्ये रोड टॅक्स, विमा, आर.टी.ओ. नौंदणी इ. वगळून आहे.) आगाऊ स्वरुपात अदा करणेस व सदरचे होणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५५ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत शाहु उद्यान, बिजलीनगर व रघुमाऊली उद्यान बिजलीनगर ही दोन उद्याने बिजलीनगर युवा प्रतिष्ठाण यांना एक वर्ष कालावधीसाठी अंशतः सेवाशुल्क तत्वावर देखभाल व संरक्षणाकामी देणेबाबत व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५६ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५७२/२०१६ दि.३०/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भांडार विभागाकडून नागरवस्ती विकास योजना विभागाचे मागणीनुसार महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांना स्वयंरोजगारासाठी मोफत शिवणयंत्र साहित्य वाटप करणेकामी खरेदी करुन मिळणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्यानुसार भांडार विभागाने ई-निविदा नोटीस क्र.४०/२०१४-१५ प्रसिद्ध करुन ऑनलाईन निविदा दर दि.२०/०२/२०१५ ते १२/०३/२०१५ अखेर मागविणेत आलेले होते. एकूण १३२९० नग शिलाई मशीन खरेदी करणेकामी १.दै.लोकमत २.दै.महाराष्ट्र टाईम्प, ३. दै.टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईट ई-निविदा सुचना क्र.४०/२०१४-१५ अन्वये प्रकटन प्रसिद्ध करुन शिलाई मशिन साहित्य खरेदी करणेकामी उत्पादित कंपनी, त्यांचे अधिकृत विक्रेते/वितरक यांचेकडून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार एकूण पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदांमध्ये लघुत्तम निविदाधारक मे. अप्रल व लेदर टेक्नीक्स प्रा.लि. यांचे Swantex Brand-SW2248 या मॉडेलचे दर प्रती नग र.रु.४७७७/- इतके लघुत्तम असल्याने ते स्विकृत करणेस आणि त्यांचेकडून १३२९० नग शिलाई मशीन (मेक - Swantex

Brand-SW2248) खरेदी करणेस एकूण र.रु.६,३४,८६,३३०/- चे अपेक्षित खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.११८९९ दि.३०/०६/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.स्थायी समिती सदस्य व काही मा.नगरसदस्य यांनी Swantex Brand-SW2248 हा ब्रँड खरेदी न करण्यासंदर्भात तसेच उषा,नॉव्हेल,सिंगर,राजेश व ब्रदर या मॉडेलचे मशीन्स खरेदी करण्याबाबत लेखी व तोंडी निवेदन सादर केलेले आहे. सबब, यापूर्वी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.११८९९ दि.३०/०६/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर ठराव रद्द करुन फेरनिविदा मागवावी तसेच उषा,नॉव्हेल,सिंगर,राजेश व ब्रदर या मॉडेलचे मशीन्स खरेदी करण्यात यावे अशी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी मा.स्थायी समिती ठराव क्र.११८९९ दि.३०/६/२०१५ रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे व उषा,नॉव्हेल, सिंगर,राजेश या मॉडेलची मशीन शॉर्ट टेंडर नोटीस (राज्यपातळीवर प्रसिद्ध करुन) काढून फेरनिविदा काढण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५७ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ३१/०५/२०१६ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९३/१६ दि.३१/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५७/२०१५-१६ मधील अ.क्र.८ अन्वये, प्रभाग क्र.४७ येथे स.नं.१२४ मध्ये नियोजित १८.०० मी. व १२.०० मी. रुंद रस्त्यासाठी नाल्यावर पूल बांधणे (आर.सी.सी.) कामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.९२,०८,६८३/- (अक्षरी र.रु.ब्याण्णव लाख आठ हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा ४२.४२% कमी या दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५५,६७,४७८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३५८ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- डॉ.साळुंके राहुल यशवंत, वैद्यकिय अधिकारी यांचा दिनांक ३०/५/२०१६ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ३६ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असलेने तो प्राप्त झालेनंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ३६ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१६३५९ विषय क्रमांक – ३७

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

श्रुजन रिसर्च अँड प्लॅनिंग फाऊंडेशन, पुणे यांस मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमण्यास व त्यांस मनपाची आर्किटेक्ट विषयक कामे देण्यास व त्याकामी होणारी फी वेळोवेळी आर्किटेक्ट कौन्सिलच्या नियमानुसार अदा करणेस तसेच त्याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६० विषय क्रमांक – ३८

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.२,१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३६१ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३६२ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे,मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग व मुख्यालयामध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१६३६३ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ३१/०५/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,९६,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/४२/२०१६
दिनांक – ०१/०६/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.